पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग समिती
कार्यपत्रिका क्रमांक – १२
सभावृत्तांत

दिनांक- **०१/ ०३ /२०१६** रोजी दुपारी - ०३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा **बुधवार दिनांक ०१/०३/२०१६ रोजी दु.** ०३.०० वाजता इ क्षेत्रीय कार्यालयातील **" संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहात आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा. आशा रविंद्र सुपे **– सभापती**
२. मा. मंदा आल्हाट
३. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
४. मा विनया तापकीर
५. मा. अनुराधा देविदास गोफणे
६. मा. वसंत (नाना) आनंदराव लोंढे
७. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
८. मा. विश्वनाथ विठोबा लांडे
९. मा. संजय निवृत्ती आहेर – स्विकृत सदस्य
१०.मा. सोमवंशी प्रकाश बबनराव- स्विकृत सदस्य
११.मा. विजय सुदाम रसाळ- स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.चंद्रकांत इंदलकर – क्षेत्रीय अधिकारी**,** मा.श्रीनिवास दांगट- प्रशासन अधिकारी, मा.जीवन गायकवाड – (कार्यकारी अभियंता स्थापत्य) मा.श्री.सतीश वाघमारे – उपअभियंता (स्थापत्य), श्री.गोविंद खैरे, सहा. उद्यान निरीक्षक, श्री.शिराळ एस.डब्ल्यू- मुध्याध्यापक , माध्य.विद्यालय, लांडेवाडी, श्री.बोरावक्के डी.एस. उपअभियंता (स्थापत्य), श्री.काळे व्ही.सी. उपअभियंता (स्थापत्य), श्री.गवळी डी.डी. उपअभियंता (स्थापत्य), श्री.ए.व्ही.कोंडे- उपअभियंता (पा.पू), श्री.धडस ए.आर. –क.अभियंता (ज.नि.), श्री.संदीप ठोकळे - क.अभियंता, श्री.व्ही.एम.मारुडा-आरोग्य निरीक्षक,श्री.आर.आर.साबळे- आरोग्य निरीक्षक,श्री.जाधव ऐ.आर. सहा. शिक्षक- माध्य.विद्यालय, लांडेवाडी,श्रीम.पवळे जयश्री- समुह संघटक,ना.वि.योजना -----

**मा.सभापती-** सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

अ) दिनांक ०४/०१/२०१७ रोजी झालेल्या सभेचा कार्यक्रमपत्रिका ०९ व १० सभावृतांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक- ४०  विषय क्रमांक- १

दिनांक- ०१/०३/२०१७

सूचक- मा. मंदा आल्हाट.  अनुमोदक- मा.सुरेखा गव्हाणे

**संदर्भ-** मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.जा.क्र.इक्षे/०२/कावि/६७/१७,
दिनांक ०७/०२/२०१७

प्रभाग क्र. २९ इंद्रायणीनगर,व प्रभाग क्र. ३० चक्रपाणी वसाहत हगणदारी मुक्त घोषीत करणेसंबंधी विशेष क्षेत्रीय सभेचे आयोजन करणेबाबत.

केंद्रशासनाने देशातील सर्व शहरामधील नागरीकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळणे याकरीता शहरांना स्वच्छतेची सवय व शहरातील सर्व नागरीकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देणेचे ध्येय गाठण्यासाठी दिनांक २/१०/२०१४ पासून स्वच्छ भारत अभियान (नागरी) संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा केलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने देखील पत्र क्र. स्वभाअ/२०१५/प्रक्र.२३/नवि/३४, दिनांक १५/५/२०१५ अन्वये केंद्र शासनाचे धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविण्याचे ठरवून दिनांक २/१०/२०१७ पर्यंत हगणदारी मुक्त (Open Defecation Free) शहरे करण्याचे उद्दिष्ट निश्चीत केलेले आहे. तसेच मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र. मातवी/१२/कावि/ ९६/ २०१६ दिनांक १/४/२०१६ अन्वये दिनांक २/१०/२०१७ पुर्वी टप्प्या टप्प्याने पिंपरी चिंचवड शहर हगणदारी मुक्त करण्याचे उद्दिष्ट निश्चीत केलेले आहे.

त्या अनुषंगाने इ क्षेत्रिय कार्यालय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. २९ इंद्रायणीनगर, व प्रभाग क्र. ३० चक्रपाणी वसाहत हे दोन प्रभाग दि. ३१/०३/२०१७ पूर्वी हगणदारी मुक्त (Open Defecation Free) घोषीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

**मा. सभापती-** यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले

आशा रविंद्र सुपे
सभापती
इ प्रभाग समिती, भोसरी – ३९

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/कावि/४/८५२/२०१७
दिनांक- ०१/०३/२०१७

प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)
इ क्षेत्रीय कार्यालय
भोसरी – ३९.

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.